# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date – 05 October 2023
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी औरंगाबाद
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – ०५ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०

****

- नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयांमधील मृत्यू प्रकरणी चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नियुक्त, कडक कारवाईची मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
- विधीमंडळाचं दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवण्याची काँग्रेस पक्षाची राज्यपालांकडे मागणी.
- 'यंग इंडीया अनचेन्ड' उपक्रम महापालिका, जिल्हा आणि तालुकास्तरावर सुरू व्हावा- मंत्री अदिती तटकरे.

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आज तीन सुवर्ण पदकं.

****

नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. आज दिल्लीतून मुख्यमंत्र्यांनी राज्यातल्या सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृष्य प्रणालीनं संवाद साधून राज्यातल्या आरोग्य सुविधांचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातल्या सगळ्या शासकीय, महापालिका आणि नगरपालिका रुग्णालयांना, प्राथमिक आरोग्य केंद्रांना आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारीतल्या रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी, आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करावा, असे आदेशही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

****

विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज काँग्रेसच्या शिष्टमंडळासह राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेत त्यांना विविध मागण्यांचं निवेदन दिलं. राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यूंसंदर्भात निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नेमणूक करावी आणि प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत करावी, मराठा आरक्षणासाठी झालेल्या जालन्यातल्या आंतरवेली सराटी इथल्या आंदोलनातल्या लाठीमार प्रकरणाबाबतही निवृत न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करावी, राज्यातल्या दुष्काळ परिस्थितीवर उपाययोजना करण्याचे निर्देश शासनाला द्यावेत तसंच शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्युंबद्दल वैद्यकीय मंत्री आणि आरोग्य मंत्र्यांना जबाबदार धरून त्यांचे राजीनामे घेण्यात यावेत अशा मागण्या या निवेदनात आहेत. याशिवाय, या सगळ्या विषयांवर चर्चा करण्यासाठी विधीमंडळाचं दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलवावं, अशी विनंतीही वडेट्टीवार यांनी राज्यपालांना या निवेदनातून केली आहे.

****

दिव्यांग बांधवांना शासनातर्फे विविध सोयी सवलती मिळवून देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचं प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी केलं आहे. हिंगोली इथे आज `दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी` हा उपक्रम राबवण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दिव्यांग लाभार्थ्यांना आवश्यक असलेल्या विविध प्रमाणपत्रांचं वाटप प्रातिनिधीक स्वरूपात करण्यात आलं.

दरम्यान, मित्रपक्ष भारतीय जनता पक्ष आपलं खच्चीकरण करत आहे, असा आरोप कडू यांनी आज हिंगोलीत पत्रकारांशी बोलताना केला.

****

महिलांविषयक गुन्हेगारीला, तस्करीला आळा घालण्यासाठी राज्य महिला आयोगाचा बंधमुक्त भारतीय युवा अर्थात `यंग इंडिया अनचेन्ड` हा उपक्रम मुंबईतल्या ३० महाविद्यालयांत सुरू होणार आहे, या उपक्रमाची महानगरपालिका, जिल्हा आणि तालुकास्तरावर व्याप्ती वाढवावी, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज मुंबईत या उपक्रमाचं उदघाटन केलं, त्यावेळी तटकरे बोलत होत्या. महिला आणि बालकांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांबाबत जनजागृती करणं यासाठी हा उपक्रम महत्वाचा आहे. सुरक्षित

वातावरणात प्रत्येकाला आपला विकास करता यावा यासाठी गुन्हा घडल्यास तरुणांनी त्याबाबत आवाज उठवावा, असं आवाहन तटकरे यांनी केलं.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची कोविड काळातली देय नुकसान भरपाई आठ दिवसात शेतक-यांना न दिल्यास पीक विमा कंपन्यांवर कारवाई करण्याचा इशारा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते आज बोलत होते. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी असलेल्या सहा कंपन्यांपैकी चार कंपन्यांकडून दोनशे चोवीस कोटी रुपये येणं आहेत, अशी माहिती देत, कोविड ही जागतिक आपत्ती होती,त्यामुळे कंपनीने सहकार्याची भूमिका घेतली पाहिजे, असं मुंडे यांनी या विमा कंपन्यांना सांगितलं.

****

पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या पी. एम. विश्वकर्मा योजनेचा इच्छुकांनी फायदा घेऊन उद्योजक बनावं आणि आपली आर्थिक प्रगती साधावी, असं आवाहन केंद्रीय मध्यम, लघू आणि सूक्ष्म मंत्री नारायण राणे यांनी केलं आहे. या योजनेच्या प्रचारासाठी आज सिंधुदुर्ग इथं परिसंवाद आणि जनजागृती कार्यक्रम झाला, त्यावेळी राणे बोलत होते. या योजनेच्या माध्यमातून विश्वकर्मा बांधवांना समृद्धी मिळेल, असा विश्वास राणे यांनी व्यक्त केला. यावेळी राणे यांच्या हस्ते काही प्रातिनिधिक कारागिरांचा सत्कार करण्यात आला.

****

हिंदी भाषेत डब केलेल्या चित्रपटाला मुंबईच्या केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अर्थात सेन्सॉर बोर्डाचं प्रमाणपत्र देण्यासाठी सात लाख रुपयांची लाच स्वीकारल्या प्रकरणी या मंडळाच्या अज्ञात कर्मचाऱ्यासह अन्य काही जणांवर केंद्रीय अन्वेषण विभागानं गुन्हा दाखल केला आहे. गेल्या महिन्यात, हे प्रमाणपत्र देण्यासाठी मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वतीनं एका महिलेनं ही लाच मागितली होती.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि चिन्हावर आपलाच अधिकार असून, निवडणूक आयोगाचा निकाल आपल्या बाजूनं लागेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. ते आज दिल्लीत एका सभेमध्ये बोलत होते. आजकाल केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर सुरू असल्याचा आरोप केंद्र

सरकारवर करत, दहा वर्षांपूर्वी या यंत्रणांची नावंही सामान्य लोकांना माहिती नसायची, असं पवार म्हणाले.

****

हाँगझो आशियाई क्रीडा स्पर्धेमधे भारतानं आज तीन सुवर्ण पदकं जिंकली. धनुर्विद्येमध्ये कंपाऊंड प्रकारात पुरुष आणि महिला संघांनी प्रत्येकी एक सुवर्ण पदकं जिंकली तर स्क्वॅशमध्ये मीश्र दुहेरीतही भारतानं विजेतेपद मिळवलं. ओजस देवतळे, प्रथमेश जावकर आणि अभिषेक वर्मा यांच्या धनुर्विद्या संघानं अंतिम सामन्यात कोरियाच्या संघाचा २३५ विरुद्ध २३० असा पराभव केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुवर्णपदक जिंकल्याबद्दल खेळाडुंचं अभिनंदन केलं आहे आणि त्यांच्या यशाचा देशाला अभिमान असल्याचं म्हटलं आहे. बॅडमिंटनमध्ये एच. एस. प्रणॉयनं उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं. भारताच्या पुरुष कबड्डी संघानं अ गटातलं प्रथम स्थान कायम ठेवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. कुस्तीमध्ये अमित पंघाल, मानसी, पूजा आणि नवीन कांस्य पदकासाठी लढत देणार आहेत.

****

काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांनी आज धाराशीव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासमोर निदर्शनं केली. जिल्हा सरकारी रुग्णालयात औषधांची तसंच आवश्यक कर्मचारी–डॉक्टरां अभावी सामान्य रुग्णांची हेळसांड होत असल्याचा निषेध यावेळी करण्यात आला. निदर्शनांनंतर अधिष्ठातांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आलं. नांदेडच्या रुग्णालय अधिष्ठातांना स्वच्छतागृहाची सफाई करायला लावणाऱ्या खासदार हेमंत पाटील यांना निलंबित करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. धुळे इथंही या मागणीसाठी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आंदोलन करण्यात आलं.

****

'मेरी माटी – मेरा देश' अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महापालिकेतर्फे आज शहरात अमृत कलश यात्रा काढण्यात आली. या यात्रेत शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. नागरिकांनी यावेळी कलशात माती संकलित केली. ही माती दिल्ली इथं अमृत वाटिकेसाठी पाठवली जाणार आहे.

****

आगामी निवडणुकीत सत्ताधारी पक्षांचा पराभव निश्चित असल्यानं त्या धास्तीनं सरकार निवडणूक घेत नाही, असा आरोप उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं केला. ते पक्षातर्फे जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी घेण्यात येत असलेल्या 'होऊ द्या चर्चा' उपक्रमात बोलत होते. छत्रपती संभाजीनगर इथल्या सिडको, हडको, मयुरनगर, यादवनगर, मुकुंदवाडी, सुतगिरणी चौक या परिसरात 'होऊ द्या चर्चा' हा उपक्रम सुरू आहे. पक्षाचे संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर तसंच जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी, उपजिल्हाप्रमुख अनिल पोलकर, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, माजी नगरसेवक किशोर नागरे या उपक्रमामध्ये जनतेशी संवाद साधत आहेत.

****